निवेदन दि.26.04.2021

विषय :- कोरोना संसर्गाची साखळी तोडण्यासाठी घातलेले निर्बंध व त्याअनुषंगाने दुर्बल घटकांसाठी जाहीर केलेले पॅकेज संदर्भात.

कोरोना संसर्गाची साखळी तोडण्यासाठी घातलेले निर्बंध व त्यानुषंगाने राज्य शासनाने रिक्षा परवाना धारकांना रु. 1500/- चे सानुग्रह अनुदान जाहिर केले आहे. सरळपणे संबंधितांच्या बँक खात्यावर ऑनलाईन पध्दतीने सदर रक्कम जमा करण्याबाबत परिवहन विभागामार्फत एक प्रणाली विकसित करण्यात येणार आहे. सदर प्रणालीची माहिती विभागाच्या https://transport.maharashtra.gov.in/1035/Home या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याकरिता रिक्षा परवानाधारकांचे बॅक खाते हे आधार क्रमांकाशी जोडणी करणे आवश्यक आहे.

तरी, सर्व रिक्षा परवाना धारकांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी आपले बँक खाते आधार क्रमांकाशी तात्काळ जोडणी करुन घ्यावी. जेणेकरुन या सानुग्रह अनुदानाची रक्कम त्यांना वेळेवर अदा करता येईल. त्याच प्रमाणे सदर प्रणाली तयार झाल्यानंतर उपरोक्त संकेतस्थळावर त्याची माहिती प्रदर्शित करण्यात येईल जेणेकरुन सर्व रिक्षा बांधवांना त्याचा फायदा घेणे शक्य होईल.

परिवहन आयुक्त कार्यालय
महाराष्ट्र राज्य , मुंबई.